# जीएमआर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : नमन सेंटर, ७वा मजला, देना बँकेसमोर, प्लॉट नं. सी-३१, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. फोन: +९१२२ ४२०२८०००, फॅक्स +९१ २२ ४२०२८००४
E: GIL.Cosecy@gmrgroup.in W: www.gmrgroup.in CIN: L45203MH1996PLC281138

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की जीएमआर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या (कंपनी) सदस्यांची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') सोमवार, १६ सप्टेंबर २०१९ रोजी दुपारी ३:०० वाजता के. आर. फाउंडेशन, शिला गोपाळ रहेजा ऑडिटोरीयम, बालगंधर्व रंगमंदिर, जंक्शन २४ आणि ३२ रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०, येथे एजीएमच्या सूचनेमध्ये विस्ताराने दिलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येईल.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०२ अनुसार स्पष्टीकरणात्मक विवरणासह एजीएमच्या सूचनेचा समावेश असणारा वित्तीय वर्ष २०१८-१९ चा वार्षिक अहवाल वितरीत करण्याचे काम कंपनीने पूर्ण केले आहे. ज्या सभासदांचे ई-मेल आयडीज् कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) यांच्याकडे नोंदविलेले आहेत त्यांच्याकडे एजीएमच्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती २० ऑगस्ट २०१९ रोजी पाठवून देण्यात आल्या आहेत आणि इतर सर्व सभासदांकडे कथित वार्षिक अहवालाच्या छापील प्रती त्यांच्या नोंदविलेल्या पत्त्यांवर सुयोग्य पध्दतीने २३ ऑगस्ट २०१९ रोजी पाठवून देण्यात आल्या आहेत.

कंपनीज (मॅनेजमेन्ट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) अमेन्डमेन्ट रूल्स २०१५ च्या रूल २० बरोबर वाचण्यात येणारे कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडियाने सादर केलेल्या सर्वसाधारण सभांबाबतचे सेक्रेटरियल स्टॅण्डर्डस (एसएस-२) आणि सिक्युरीटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('सेबी एलओडीआर') चे रेग्युलेशन ४४ यांची पूर्तता करताना एजीएमच्या ठिकाणाव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणावरून ('रिमोट ई-व्होटिंग') इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून ई-व्होटींग सुविधा पुरविणारी एक संस्था म्हणून कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड ('कार्वी') यांनी पुरविलेल्या इलेक्ट्रॉनिक व्होटींग सिस्टीमचा वापर करून एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्याची सुविधा सभासदांना पुरविण्यात आली आहे आणि अशा प्रकारच्या मतदानाद्वारे कामकाज पार पाडता येऊ शकेल.

रिमोट ई-व्होटिंग कालावधी १३ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल आणि १५ सप्टेंबर २०१९ रोजी सायंकाळी ५:०० वाजता समाप्त होईल (दोन्ही दिवस समाविष्ट). कट-ऑफ दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजी ज्यांच्याकडे भौतिक स्वरूपात किंवा डिमॅट स्वरूपात शेअर्स असतील असे कंपनी सदस्य उक्त एजीएममध्ये रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंग सुविधेद्वारे मतदान करू शकतात. एकदा एखाद्या ठरावावर सदस्याने मत दिले की ते त्याला नंतर बदलता येणार नाही. रिमोट ई-व्होटिंग मॉड्युल १५ सप्टेंबर २०१९ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यानंतर मतदानासाठी निष्क्रिय केले जाईल. सदस्यांचे मतदानाचे हक्क त्यांनी दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजी कंपनीच्या भरणा केलेल्या भागभांडवलामध्ये धारण केलेल्या समभागांच्या प्रमाणात असतील.

सभेच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्याची ('इन्स्टा पोल') सुविधा उपलब्ध असेल आणि ज्या सभासदांनी त्या आधीच रिमोट ई-व्होटींगद्वारे मतदान केलेले नसेल असे सभासद एजीएमच्या वेळेस आपला अधिकार बजावू शकतील. ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे त्यांचे मत दिले असेल त्यांना एजीएमला उपस्थित राहता येईल पण त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही. कट-ऑफ दिनांकाला कंपनीची सभासद असणारी कोणतीही व्यक्ती रिमोट ई-व्होटींग अथवा इन्स्टा पोलचा वापर करून एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यास पात्र असेल. ज्या व्यक्तीने एजीएम सूचनेच्या पाठवणीनंतर शेअर्स संपादित केले असतील आणि जी कट-ऑफ दिनांकाला शेअर्स धारण केलेले असल्याने सदस्य असेल ती evoting@karvy.com वर विनंती पाठवून लॉग-इन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

वार्षिक अहवालाची प्रत www.gmrgroup.in ह्या कंपनीच्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे तसेच एजीएमची सूचना आणि स्पष्टीकरणात्मक निवेदन कार्वीच्या evoting.karvy.com ह्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ कलम ९१ आणि सेबी एलओडीआर नियमन ४२ अन्वये पुढे सूचना देण्यात येते आहे की कंपनीची सदस्य नोंदवही आणि शेअर हस्तांतरण पुस्तके सोमवार दि. ९ सप्टेंबर २०१९ ते सोमवार दि. १६ सप्टेंबर २०१९ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील व त्यादरम्यान कोणत्याही शेअर हस्तांतरणाची नोंद होणार नाही. ज्या व्यक्तीचे नाव सदस्य नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजनी राखलेल्या लाभार्थी मालक नोंदवहीमध्ये कट-ऑफ दिनांकाला असेल तिलाच रिमोट ई-व्होटिंगद्वारे तसेच एजीएममध्ये मतदान करण्याचा हक्क असेल. रिमोट ई-व्होटिंगशी संबंधित सविस्तर सूचनांसाठी कृपया एजीएम सूचना पहा. ई-व्होटिंग संदर्भात काही प्रश्न किंवा तक्रारी असतील तर सदस्यांनी श्री एस. व्ही. राजू, डीजीएम कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्याशी +९१-४०-६७१६१५०० ह्या दूरध्वनी क्रमांकावर किंवा einward.ris@karvy.com ह्या ई-मेल वर संपर्क साधावा.

एजीएममध्ये उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीला त्याच्या/तिच्या प्रतिनिधीची नियुक्ती करण्याचा हक्क आहे आणि प्रतिनिधी कंपनीचा/ची सदस्य असणे आवश्यक नाही. प्रतिनिधी परिणामकारक ठरण्यासाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभा सुरू होण्यासाठी नियुक्त वेळेपूर्वी ४८ तास आधी, पण त्यानंतर नव्हे, प्राप्त होणे आवश्यक आहे.

हरित उपक्रमाला पाठबळ देण्यासाठी, ज्या सदस्यांनी अद्याप त्यांचे ई-मेल पत्ते नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांचे ई-मेल पत्ते, त्यांच्या इलेक्ट्रॉनिक धारणा संदर्भात त्यांच्या डिपॉझीटरी पार्टीसिपंटद्वारे नोंदविण्याची विनंती आहे. ज्या सदस्यांनी भौतिक स्वरूपात शेअर्स धारण केलेले आहेत त्यांनी कंपनीच्या (www.gmrgroup.in) ह्या वेबसाईटवर उपलब्ध असलेले फॉर्म्स भरून त्यांचे ई-मेल पत्ते नोंदवावेत आणि ते कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड (आरटीए) कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद - ५०००३२ ह्यांच्याकडे पाठवावेत अशी त्यांना विनंती आहे.

जीएमआर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
टी. वेंकट रमणा
कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स ऑफिसर

स्थळ : नवी दिल्ली
दिनांक : २३.०८.२०१९

GMR GROUP – GIL / 146 / PREM ASSOCIATES - MAR